शनिवार, दि. 5 ऑक्टोंबर 2024


महासागर अमरावती

पान 3



### राहून राहून दगडफेक

यावेळी जमावाकडून राहून-राहून पोलिसांवर दगडफेक होत होती, जमावाला नियंत्रीत करण्याकरिता ग्रामीणचे पोलिस अधिक्षक विशाल आनंद आपली आरसीपी घेवून घटनास्थळी दाखल झाले होते. यावेळी परिसरातील वीज पुरवठाही खंडीत करण्यात आला होता, हे विशेष.







# यति नरसिंहानंद सरस्वतीच्या वक्तव्यावर अमरावतीमध्ये तणाव

## नागपूरी गेट पोलीसांवर दगडफेक, पोलीस वाहनाची तोडफोड | जमाव पांगविण्याकरिता अश्रुधुराच्या नळकांड्या, मिरची बॉम्बही फोडले

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.4)-यति नरसिंहानंद सरस्वती यांनी पैंगबर यांच्याबद्दल केलेल्या वादास्पद बयाणामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखाविल्या गेल्या आहे. ज्यामूळे मुस्लिम समाजाने विविध पोलीस स्टेशनवर धडक देवून यती नसरसिंहानंद सरस्वती यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली, अशीच मागणी घेवून येथील नागपूरी गेट पोलीस स्टेशनवर धडकलेल्या एका जमावाने पोलीसांवर दगडफेक केली, ज्यानंतर पोलिसांकडून जमावावर लाठीचार्ज करण्यात आला. तसेच जमावाला पांगविण्याकरिता अश्रुधुराच्या नळकांड्यासुध्दा फोडण्यात आल्या. घटनेनंतर नागपूरी गेट, खोलापूरी गेट परिसरात तणावाची परिस्थिती होती.

यति नरसिंहानंद सरस्वती यांनी यापुर्वीही मुस्लिम समाजाच्या भावना दुखाविल्या होत्या. आता पुन्हा एकदा त्यांनी दिलेल्या बयानानंतर शुक्रवारी (दि.4) अचलपूर, परतवाडा, अमरावतीसह अन्य ठिकाणी मुस्लिम समाजाकडून पोलिसांना निवेदन देवून नरसिंह सरस्वतीवर गुन्हा दाखल करत त्यांना अटक करण्याची मागणी करण्यात आली. सायंकाळी यामधील काही लोक नागपूरी गेट पोलिस ठाण्यावर पुन्हा धडकले. पाहता-पाहता येथे जमावाने विशाल रुप घेतले. त्यामूळे तातडीने क्युआरटी, आरसीपी व अन्य पोलीस दल येथे तैनात करण्यात आले. उपस्थित जमावाने गोंधळ घातल्याने पोलिसांनी त्यांना आवरण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर जमावाकडून पोलिसांवर दगडफेक करण्यात आली. जमावाला पांगविण्याकरिता पोलिसांकडून अश्रुधुराच्या नळकांड्या, मिरची बॉम्बही फोडण्यात आले.



### शहरात नाकाबंदी

यावेळी जमावाकडून दगडफेकीत पोलीस वाहनाचीही तोडफोड झाली. घटनास्थळी सिपी, डीसीपीसह सर्व पोलिस अधिकारी दाखल झाले होते, आयुक्तालयासह संपुर्ण जिल्ह्यात अलर्ट घोषीत करण्यात आला असून नागपूरी गेट येणाऱ्या सर्व रस्त्यांवर नाकाबंदी करण्यात आली. पोलिसांची पेट्रोलींग वाढविण्यात आली असून संशयीत लोकांवर पाळत ठेवली जात आहे.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# गांजा तस्करीतील दोघे गजाआड

**1 लाख 97 हजार रुपयांचा 9.865 किलो ग्रॅमचा गांजा जप्त ■ गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 ची कारवाई**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)** – गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पोलिस पथकाने 3 ऑक्टोंबर रोजी रात्री पचंवटी चौकात सापळा रचून दोन गांजा तस्करांना अटक केली. सैयद अजमत सैयद मुकदर (55, रा. आझाद नगर गल्ली क्रं. 1) व समीर शहा नाजीर शहा (27, रा. मुक्ती झिया मदरसाजवळ, लालखडी) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून 1 लाख 97 हजार रुपयांचा 9.865 किलो ग्रॅमचा गांजा जप्त करण्यात आला आहे.

गुन्हे शाखा युनिट क्रं. 1 चे पोलिस अधिकारी व अमलदार हे 3 ऑक्टोंबर रोजी रात्री गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलींग करीत असताना, गुप्त माहिती मिळाली की, अजमत व त्याचे साथीदार हे पंचवटी चौकातील डॉ. पंजाबराव देशमुख हॉस्पीटलजवळ गाजा बाळगून विक्रीसाठी येत आहे. या माहितीवरून पोलिसांनी पचंवटी चौकात सापळा रचला असता अजमत व त्याचा साथीदार हा पिडीएमसी हॉस्पीटलकडून पंचवटीचौकाकडे येताना दिसला. दरम्यान पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्यानी शर्टच्या आतमध्ये पोटाला पांढर्या कलरच्या कापडी पटटयात काही तरी बाधंलेले असल्याचे दिसले. पोलिसांनी त्याला उघडून पाहीले असता त्यातील प्लास्टीकमध्ये गांजा हा अमलीपदार्थ मिळून आला. त्यामुळे पोलिसांनी दोघांनाही अटक करून, त्यांच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणात दोन्ही आरोपींविरुध्द गाडगेनगर ठाण्यात एन.डी.पी.एस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, आरोपींना गाडगेनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, सहायक पोलीस आयुक्त अरूण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट क्रमांक 1 चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, योगेश इंगळे, पीएसआय प्रकाश झोपाटे, फिरोज खान, सतिश देशमूख, अलीमउददीन खतीब नाईक, सुधीर गुडदे, पोलीस अमंलदार नाझिमउददीन सैय्यद, विकास गुडदे, चेतन कराळे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, अमोल मनोहर, चालक रोशन माहुरे, किशोर खेंगरे तसेच पोलीस स्टेशनचे पोलिस, सायबरचे सहायक पोलीस निरिक्षक अनिकेत कासार, अमलदार निखील माहूरे यानी केली आहे.

# दुर्गा मातेची मूर्ती नेणाऱ्या ट्रॅक्टरला ट्रक धडक

## चार युवक गंभीर जखमी

■ **शेकडो हिवरखेड वाशीयांचा जमाव घटनास्थळी**

■ **पोलिसांनी आयशर चालकाला घेतले ताब्यात**

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी (दि. 4)** – दुर्गा मातेची मूर्ती नेणार्या ट्रॅक्टरला आयशर गाडीने जोरदार धडक दिल्याची घटना घटना 3 ऑक्टोबर रोजी संध्याकाळी 9 वाजताचे सुमारास घडली. मायवाडी ते दापोरी दरम्यान भुसारी यांच्या नर्सरीसमोर घडलेल्या अपघातात. चार युवक गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना मोर्शी येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर त्यांना अमरावती येथील रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे. घटनेचे वृत्त समजताच शेकडो हिवरखेड वाशीयांचा जमाव घटनास्थळी दाखल झाल्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाला. या घटनेमुळे नवरात्र उत्सवाच्या पहिल्याच दिवशी गालबोट लागल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार हिवरखेड येथील श्रीकृष्ण दुर्गा मंडळाची दुर्गादेवी मोर्शी येथून ट्रॅक्टरमध्ये जात असतांना मोर्शी येथून वरुडकडे मागाहून केळी भरून जाणार्या आयशर गाडी क्र.एम एच 27 डीएक्स 45 55 च्या चालकाने ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. त्यामुळे ट्रॅक्टरमध्ये दुर्गादेवी पकडून बसलेल्या जयेश राजू कपिले (28), प्रतीक अशोक गीद (25), राजेश प्रल्हादराव बिजवे (31) व प्रज्वल बारस्कर (23) हे चार युवक गंभीर जखमी झाले. त्यांना त्वरित मोर्शी येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, गंभीर जखमी असल्याने त्यांना अमरावती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यावेळी हिवरखेड येथील 600 ते 700 नागरिकांचा जमाव जमा झाल्यामुळे तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली. घटनेची माहिती प्राप्त होताच मोर्शी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन आयशर चालकाला ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे. ट्रॅक्टरमधील दुर्गादेवी मातेच्या मूर्तीला क्रॅश आल्यामुळे मंडळातर्फे या मूर्तीची स्थापना करण्यात येणार नसल्याचे भाजपाचे तालुकाध्यक्ष निलेश शिरभाते यांनी सांगितले.

# सिल तोडून दुकानावर घेतला ताबा

**अमरावती** – ड्रिमलॅन्ड व्यापारी संकुलातील एका दुकानाचे सिल तोडून ताबा घेण्यात आल्याची घटना 3 ऑक्टोंबर रोजी उघडकीस आली. पंजाब नॅशनल शाखा बॅकेचे प्रबंधक पंकज पाटील यांनी नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली की, ड्रिमलॅन्ड येथील बॅकेच्या मालकीचे असणार्या दुकानाचे सील तोडून, त्यावर मोहन कन्हैयालाल केवलानी यांनी अवैधरित्या ताबा घेतला आहे.

# गणेशपुर येथे महिला ग्रामसेवकाला मारहाण करणारा आरोपी फरारच

**महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन आक्रमक**

## 4 ऑक्टोंबर असहकार आंदोलन करण्याचा संघटनेचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी (दि.4)**– स्थानिक पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम गणेशपुर येथील ग्रामपंचायत सदस्य प्रकाश रामदास आजनकर यांनी कर्तव्यावर असलेल्या ग्रामसेविका माधुरी दामोदर देवघरे यांचा हात पिरगळत मारहाण केली होती. या प्रकरणात मोर्शी पोलिसांनी विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. परंतु आजपर्यंत आरोपीला अटक न झाल्याने स्थानिक महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनने आरोपीला तातडीने अटक करण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन ग्रामसेवक युनियनचे अध्यक्ष विजय श्रीराव यांच्या नेतृत्वात ठाणेदार नितीन देशमुख यांना 3 ऑक्टोंबर बुधवार ला दिले आहे.

ग्रामसेवक युनियनच्या निवेदनात म्हटल्याप्रमाणे सदर घटना 28 सप्टेंबर 2024 ला गणेशपुर ग्रामपंचायत येथे घडली असून, आज पर्यंत आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. काही राजकीय व्यक्तिमत्व आरोपीला पाठीशी घालत असल्याचा आरोप करीत ग्रामसेवक युनियनने दि. 4 ऑक्टोंबर 2024 पासून संपूर्ण मोर्शी तालुक्यात असहकार आंदोलन सुरू करण्याचा इशारा निवेदनातून दिला आहे. निवेदन देतेवेळी विजय श्रीराव, सागर भातुलकर, बाळासाहेब गावंडे, विजय पंचाळे, विनोद लोखंडे, राजेश भडांगे, विनोद राऊत, अजय फाटे, निशिकांत गेडाम, नितेश गेडाम, महेंद्र उके, प्रवीण राऊत, राम तागडे, संजय दोड, संजय धुर्वे, माधुरी देवघरे, मंगलाताई गावंडे, गीता भांगे, अर्चना शेळके, सविता पाटील, सीमा फुके, दीपिका कुबडे इत्यादी उपस्थित होते.

# दुचाकी लंपास

**अमरावती** – सिटी कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बापट चौक स्थित भांमोरे वाईन शॉपसमोरून एका तरुणाची दुचाकी चोराने लंपास केली. अविनाश ज्ञानेश्वर तायडे (32, रा. औरंगपूरा) यांनी एमएच 27 एवाय 7283 या क्रमांकाची दुचाकी बापट चौकातील बापट चौक स्थित भांमोरे वाईन शॉपसमोर उभी केली होती. त्यानंतर ते मथुरा हॉटेलमध्ये जेवणाकरिता गेले. तेथून परत आल्यानंतर त्यांना दुचाकी दिसली नाही.

# पत्नीचा पतीवर चाकूने वार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)** – आई-वडिलांना शिविगाळ करणार्या पत्नीला जाब विचारणार्यावर पतीवर चाकूने वार करण्यात आले. ही घटना गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत 3 ऑक्टोंबर रोजी उघडकीस आली. पतीच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी आरोपी पत्नीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

पतीच्या तक्रारीनुसार, त्यांच्या पत्नीचे एका पुरुषासोबत अनैतिक संबंध आहे. त्यामुळे पत्नी ही पतीशी विनाकारण वाद घालत असते. 3 ऑक्टोंबर रोजी पत्नीही पतीच्या आई-वडिलांना शिविगाळ करीत होती. त्यावेळी पतीने पत्नीला विचारणा केली असता, तिने थेट स्वयंपाक गृहातील चाकू आणून पतीवर वार केले. त्यामुळे पतीच्या डाव्या हाताच्या अंगठ्यावर चाकू लागला आणि पतीला जखम झाली. या घटनेची तक्रार पतीने गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली.

# ग्राम वाचनालयात गांधी, शास्त्रींची जयंती साजरी

**दोन्ही विभूतींना आदरांजली**

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,(दि.4)** – येथील ग्राम वाचनालय हिवरखेड येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व देशाचे तिसरे पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वरील कार्यक्रम साहेबराव मो.पाटील यांचे अध्यक्षतेखाली वप्रमुख पाहुणे पंजाबराव ढोरे, माजी सरपंच देवेंद्र गोरडे, नानासाहेब धरामकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी येथील अनुप बगेकर या तरुणाने डॉ.एस आर.रंगनाथन वाचनालयाचे जनक यांचा स्केच फोटो स्वत: काढुन वाचनालयाला भेट दिला. त्या बद्दल त्या विद्यार्थ्यांचा शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी महात्मा गाधीजी व लाल बहादुर शास्त्री यांचे जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. या प्रसंगी वाचनालयाचे सचिव निंभेकर यांनी प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथपाल अनंतराव फांजे यांनी केले. या




प्रसंगी वाचनालयाचे पदाधिकारी, सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ उपस्थीत होते. या कार्यक्रमा करिता पंकज भडके व भूषण बेलसरे यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# खड्डूयामध्ये पडलेल्या बेवारस गाईचे वाचविले प्राण

**जीवनसेतू जलमित्र आपत्ती बचाव दलाचे प्रशंसनीय कार्य**

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.4)**– मोर्शी येथील पाळा सालबर्डी रोड वरील जीवनसेतू जलमित्र आपत्ती बचाव दलाने गड्डूयामध्ये बेवारस स्थितीत पडलेल्या एका गाईला सुरक्षित बाहेर काढून जीवदान दिले. त्यामुळे या बचाव दलाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्थानिक पाळा सालबर्डी रोडवरील जीवन सेतू जलमित्र आपत्ती बचाव दल यांना शेतातील एका शेतकऱ्याचा 2 ऑक्टोबरला फोन आला आला की आमच्या शेताच्या बाजूला बेवारस गाय गड्डूयामध्ये गंभीर अवस्थेत पडली आहे. तशीच माहिती मिळता जीवनसेतू जलमित्र आपत्ती बचाव दलाची चमू सुरज धुर्वे, चंदन ठाकूर, विवेक सावरकर, प्रियांशू तायवाडे, प्रतीक खवले, तेथे पोहोचले व त्या गाईची पाहणी केली. तेव्हा ती गाय एका गड्डूयामध्ये पडून गंभीर झाली होती. यावेळी त्या गाईला स्थानिकांची मदत घेऊन बेल्ट व



दोराच्या सहाय्याने खड्डयातून सुरक्षित बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्या गाईला तिच्या मालकाच्या स्वाधीन केले.

# दुसऱ्या दिवशीही सुरु होते ठिया आंदोलन

**पिकविम्याच्या अग्रिम रकमेच्या मागणीकरिता तालुका शेतकरी संघटनेचे आंदोलन**

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,(दि.4)** – यावर्षी सततच्या पावसामुळे मूग, उडीद, सोयाबीन तसेच केळी, संत्रा व लिंबूवर्गीय फळ पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून शेतकरी पिक विम्याची अग्रीम रक्कम भरतात. परंतु विमा कंपनी प्रतिनिधी व कृषी सहायक यांचा आपसी ताळमेळ नसल्यामुळे नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे योग्य रितीने करण्यात येत नाहीत. त्यामुळे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना या पीक नुकसानीचा मोबदला मिळत नसल्याने शेतकऱ्यांना तत्काळ पिक विमा लागू व्हावा यासाठी दोन दिवसापासून शेतकरी संटनेचे कार्यकर्ते तालूका कृषी कार्यालयात ठिय्या देऊन बसले असून तिर्सया दिवशी आंदोलन तीव्र होण्याची शकूयता वर्तविण्यात येत आहे.



शेतकऱ्यांचा संताप व आक्रोश पाहता कृषी अधिकारी व तहसीलदार आंदोलन स्थळी चर्चा करण्यास आले तेव्हा शेतकऱ्यांनी पिक विमा पाहणी व पंचनामा संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले. ज्यात शेतकऱ्यांना 72 तासाच्या तक्रार करणे अनिवार्य आहे, तर मग कंपनीने तक्रारीचे किती दिवसात निराकरण करणे अनिवार्य आहे? याबाबत कंपनीने लेखी उत्तर द्यावे., मूग उडीद सोयाबीनच्या तक्रारी करूनही दोन महिने उलटून गेले तरीही त्या पिकांचे नुकसानीची पाहणी झाली नाही, तेव्हा आता त्या पिकांच्या नुकसानीचा सर्वे कसा करण्यात येईल कारण शेतकऱ्यांनी पुढचे पीक (आंतरपीक )घेण्याकरिता शेताची मशागत केली आहे, सर्वे करताना संबंधित कृषी सहाय्यक पंचनाम्यावर सही करीत नाहीत, ऑनलाइन साईट काही कालावधीत बंद असल्यास शेतकरी तक्रार कशी करणार याबाबत काय कार्यवाही होणार ?अशी विचारणा करण्यात आली. या प्रश्नावर तहसीलदार पुष्पा डाबेराव (सोळंके) व तालूका कृषी अधिकारी नरेंद्र वसुकर यांचे सोबत चर्चेदरम्यान अमरावती विभागाचे मुख्य प्रतिनिधी सूर्यवंशी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे देऊन संध्याकाळी सहा वाजेपर्यंत या विषयावर निर्णय देण्याचे सांगीतले. शेतकऱ्यांचे जीवन मरणाचे संबंधात तहसीलदार व कृषी अधिकारी प्रत्यक्ष विमा कंपनीच्या प्रतिनिधीशी बोलणे करीत असताना तालुक्याचा जबाबदार अधिकाऱ्यांचे कंपनी प्रतिनिधी ऐकायला तयार नाहीत. सायंकाळी सात वाजेपर्यंत शेतकरी कृषी कार्यालयात ठिय्या देऊनच होते तर कृषी अधिकारी वरिष्ठासोबतषचर्चा करिता होते.ठिय्या आंदोलन स्थळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माधवराव गावंडे, तालुकाध्यक्ष संजय हाडोळे, स्वभाप चे अध्यक्ष गजानन पाटील दुधाट, वीरा आसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील साबळे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष सागर हुरबडे, संघटना समन्वयक मनोहर दादा रेचे, मानकर महाराज शास्त्री, देविदास ढोक, विजयराव बोके. अशोकराव गीते, किशोर पाटील काळमेघ, ओमप्रकाश मुरतकर, मधुकर मोरे, अच्युतराव गोबरे, संजय हिंगे, ज्ञानेश्वर वानखडे, विनोद चिंचोळकर, अनिल आडे, सुनील पडोळे, अनिल मेमनकार, भीमराव काळमेघ, महेश खारोळे, निलेश देशमुख व हजारो शेतकरी उपस्थित होते.

# नाल्याचे पाणी शेतात घुसले

## पिक गेली खरडून

■ **तक्रारीनंतरही बांधकाम व कृषी विभाग झोपेत** ■





> जमिनीचे नुकसान थांबविण्या करिता या नाल्याला दोन्ही कडून सिमेंट कॉंक्रिट ची संरक्षण भिंत बांधून देण्यात यावी तसेच नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा मला उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल.
>
> **नंदकिशोर मुंदडा, शेतकरी शिरखेड**

> नाल्याचे पाणी माझे शेतात घुसून पिकाचे व जमिनीचे मोठ्या प्रमाणात दरवर्षी नुकसान होत आहे. याला जबाबदार सा.बां. विभाग आहे. तरी या पुलाची उंची वाढवावी व पीक नुकसानीची मदत देण्यात यावी अन्यथा आम्ही सर्व शेतकरी उपोषणाला बसू.
>
> **बाबुराव पडोळे शेतकरी लाडकी (बु.)**

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.4)** – शेतकऱ्यांच्या पिकांचे उत्पादन वाढावे सिंचनाला पाणी मिळावे यासाठी शासनाने नाल्यावर बंधारे बांधून सोय केली आहे. परंतू बंधाऱ्याचे खोलीकरण नसल्याने नाल्याचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात शिरल्याने पिकाचे व जमिनीचे जमीन पिकासह खरडून गेली. ज्यामूळे शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

शिरखेड येथील शेतकरी नंदकिशोर मुंदडा यांचे शेत मौजा लाडकी(बु) शेत शिवारात येत असून नाल्याच्या पाण्याने या शेतकऱ्याचे सात एकर शेतातील सोयाबीन, तुर, कपासी या पिकांचे दरवर्षी अतोनात नुकसान होत आहे. आता दोन तीन दिवसापूर्वी जोरदार पाऊस आला असल्याने आणि बंधाऱ्याचे खोलीकरण नसल्याने तसेच शिरखेड-लाडकी.बु रस्त्यावरील पुल जमीन लेव्हल उंचीने कमी असल्यामुळे या शेतकऱ्याचे दरवर्षी नुकसान होत आहे. दरवर्षी शेतकरी स्वखर्चाने नाल्यावर, माती, मुरूम, दगड आणून बांध भरण्याचे काम करतो. याही वर्षी बांधावर सत्तर हजार रुपये खर्च केले त्याच्या काहीच उपयोग झाला नाही. या संबंधी शेतकऱ्याने संबंधित विभागाला दरवर्षी आजपर्यंत लेखी तक्रारी दिल्या, पण संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करून तक्रार अर्जाला केराची टोपली दाखवितो. याच नाल्याला लागून मौजा खानपूर शिरखेड असून या मौजा मध्ये शिरखेड लाडकी.बु येथील शेतकरी यांची जमीन असून या मौजा मध्ये शिरखेड लाडकी बु येथील शेतकरी बाबुराव पडोळे यांची शेती मौजा खानपूर शिरखेड शिवारात असून यांच्या शेताच्या काठावरून हाच मोठा नाला जात असून या नाल्याला मोठ्या प्रमाणात पूर येत असून त्या नाल्याचे पाणी शेतात येत असल्यामुळे पिकाचे व शेत जमिनीचे मोठ्या प्रमाणात दरवर्षी नुकसान होत असते. याही वर्षी सुद्धा दोन वेळा पिकाचे व जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या संबंधी सार्वजनिक बांधकाम विभाग मोर्शी व कृषी विभाग मोर्शी यांना सहा वर्ष पासून सतत निवेदन देऊन पुलाची उंची वाढवून देण्याची मागणी करून तसेच दरवर्षी नुकसान होत आहे. नाल्याचे पुलाखालील पाईप बुजल्याने, हे नाल्याचे पाणी थेट शेतात शिरत आहे. मौजा खानपुर, मौजा लाडकी बु या शिवारातील अंदाजे 25 ते 30 शेतकऱ्यांचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. मौजा खानपुर, हे शिवार शिरखेड मध्ये येत असून हे गाव तिवसा विधानसभा मतदारसंघात येत असून याचे प्रतिनिधित्व आ.यशोमती ठाकूर करत आहे. तसेच मौजा लाडकी बु शिवार लाडकी बु मध्ये येत असून त्याचे प्रतिनिधित्व आ.देवेंद्र भुयार करीत आहे. या लोकप्रतिनिधींना शेतकऱ्यांच्या समस्या विषयी काही देणे घेणे नाही असे दिसत आहे. पुलाला कठडे नसल्याने अनेक अपघातही येथे झाले आहे.



चांदूर बाजार -सत्यम दुर्गाउत्सव मंडळ, जसापूर



चांदूर बाजार -सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळ काजळी



चांदूर बाजार-सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळ देऊरवाडा



चांदूर बाजार-कार्तिक स्वामी दुर्गा उत्सव मंडळ माळीपुरा जसापुर



चांदूर बाजार-नुतन दुर्गोत्सव समिती, सरदार वल्लभभाई पटेल चौक, चांदूर बाजार.

# सकाळचे 11.15 मि. झाले, तरी कर्मचारी बेपत्ता

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.4 )** - ग्रामीण भागातील नागरिकांना विविध कामासाठी तहसील कार्यालयामध्ये यावे लागते, सकाळी 10 वाजताचा वेळ असतानाही 11.15 मिनीट वाजूनही कार्यालयातील कर्मचारी बेपत्ता होते, त्यामूळे उपस्थित नागरिकांनी यावेळी तहसील कार्यालय प्रशासनाविरुध्द आपला तीव्र संताप व्यक्त केला.

गेल्या काही महिन्यापासून तहसील कार्यालय हे रामभरोसे असल्याचे चित्र दिसून येत आहे. आरोप आहे की, तहसील कार्यालयाचे कर्मचारी हे कोणाचेही न ऐकता मनमानी करीत आहे. ग्रामीण भागातील नागरिक विविध कामासाठी तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवितात. परंतु तहसील कार्यालयाचे कर्मचारी हे त्यांना दाद देत नाही. त्यामूळे नाईलाजास्तव नागरिकांना रित्या हाती घराकडे परतावे लागते. यावर तहसीलदारांचा वचक नसल्यामुळे हे सर्व घडत असल्याचे बोलल्या जात आहे. तहसीलदार हा तहसील कार्यालयाचा प्रमुख असल्यामुळे तहसील कार्यालयाचे कर्मचारी हे तहसीलदार यांचे आदेशानेच



कामकाज करतात, परंतु तहसीलदारच काही करत नसेल तर कर्मचारी कसे काम करणार हाही प्रश्न महत्त्वाचा आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात शासकिय कर्मचाऱ्यांकरित पाच दिवसांचा आठवडा करुन कार्यालयीन कामकाजाची वेळी 9.45 ते सायं.6.15 ही करण्यात आली होती. काही दिवस कर्मचाऱ्यांनी ही वेळ पाळली, मात्र आता हे कर्मचारी मनमौजी वेळेवर कार्यालयात पोहोचतात. या प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेऊन मोर्शीचे उपविभागीय अधिकारी यांनी वरुड तहसीलचा कारभारावर नियंत्रण ठेवायला हवे, आणि कामचुकार, लेटलतीफांवर कारवाई करायला हवी. अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांनी करित आहेत.

## तहसील कार्यालय रामभरोसे

'मी तहसीलमध्ये माझ्या वैयक्तिक कामासाठी दहा वाजता आलो. मला तहसील कार्यालयामध्ये एकही कर्मचारी आढळून आला नाही. तरीही मी सव्वा अकरा वाजेपर्यंत कर्मचाऱ्यांची वाट पाहत बसलो, माझ्यासोबत असंख्य नागरिक सुद्धा कामासाठी आले होते. परंतु सव्वा अकरा वाजूनही कर्मचारी तहसील कार्यालयात उपस्थित झाले नव्हते.त्यामूळे माझे काम होऊ शकले नाही.

**देवेंद्र शेळके,**
**ग्राम लिंगा येथील रहिवासी.**



## अचलपुर न.प. कडून गांधी जयंती दिनी स्वच्छता अभियान

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, ( दि.4 )**- अचलपूर नगर परिषदेकडून गांधी जयंतीच्या पर्वावर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी जल, वायु, प्रदूषण, स्वच्छता, पर्यावरण प्रति चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थी यांना मान्यवरांच्या हस्ते न.परिषदेच्या सभागृहामध्ये बक्षीस वितरण करण्यात आले. सकाळी 10 वाजता आरोग्य विभाग न.प.अचलपुर कडून 17 ते 2 ऑक्टोंबरमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. घेण्यात चित्रकला स्पर्धेमध्ये 400 विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. विजयी स्पर्धकांना शिल्ड, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देत सन्मानित करण्यात आले. नप मुख्याधिकारी धीरज गोहाड यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून स्वच्छता दूत डॉ.देवेंद्र अग्रवाल, प्रमुख अतिथि व मार्गदर्शक म्हणून आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटनेचे अध्यक्ष योगेश खानझोडे, तर प्रमुख उपस्थितीत प्रशासन अधिकारी प्रमोद टेकाडे, पाणिपुरवठा अधिकारी सचिन चावके, लेखा परीक्षक प्रमोद वानखडे, लेखापाल निकोसे, वरिष्ठ लिपिक सागर महल्ले यांची उपस्थिती होती.


## जाहीर ई-निविदा सूचना

अमरावती जिल्ह्यातील पाणी टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील गावे, वाड्या, तांडे, नगर पंचायत क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार खाजगी टँकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी इच्छुक निविदा धारकांकडून करारनाम्यातील नमूद केलेल्या दिनांकापासून 1 वर्ष कालावधीकरीता ई-निविदा ऑनलाईन पद्धतीने www.mahatenders.gov.in व www.amravati.nic.in संकेतस्थळावर दि. ४/१०/२०२४ रोजी उपलब्ध होणार असून निविदेबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | :- | अमरावती जिल्ह्यातील पाणी टंचाई ग्रस्त ग्रामीण भागातील गावे, वाड्या, तांडे, क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार खाजगी टँकर्सने पिण्याचा पुरवठा करणे. |
| ऑनलाईन ई-निविदा फॉर्मची किंमत | :- | रूपये १०,०००/- (अक्षरी - दहा हजार रूपये फक्त) |
| ई-निविदा विक्री डाऊनलोड करण्याच दिनांक | :- | दि. ७/१०/२०२४ सकाळी ११.०० वाजता ते दि. १८/१०/२०२४ |
| बयानाची रक्कम | :- | रू. २,००,०००/- (अक्षरी - दोन लक्ष रूपये फक्त) |
| सुरक्षा ठेव/अनामत रक्कम | :- | रू. २,१०,०००/- (अक्षरी - दोन लक्ष रूपये फक्त) |
| ई-निविदा ऑनलाईन भरण्याची अंतिम तारीख | :- | दि. १८/१०/२०२४ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याची तारीख व वेळ व स्थळ | :- | दि. २१/१०/२०२४ रोजी दुपारी ५.०० वाजता स्थळ जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती |

अधिक माहितीसाठी www.mahatenders.gov व www.amravati.nic.in या संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिद्ध झाल्यापासून नियमित तथा वेळोवेळी भेट द्यावी.

**( सौरभ कटियार, भा.प्र.से. )**
**जिल्हाधिकारी, अमरावती**

**विमाका/अम/जाही/587**



# ग्रामपंचायत कार्यालय रेवसा, ता.जि. अमरावती

## निविदा सुचना क्र. ०१

ग्रामपंचायत कार्यालय रेवसा, ता. अमरावती जि. अमरावती यांचे मार्फत अनु. जाती व नवबौद्ध घटक वस्तीचा विकास योजना सन २०२३-२०२४, १५ वा वित्त आयोग सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २३-२४ व २०२४-२५, सामान्य निधी २०२४-२५ मध्ये खालील या कामांची मोहोरबंद निविदा ब-१ टक्केवारी प्रपत्रामध्ये बांधकाम विभाग जिल्हा परिषद यांचे वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा सरपंच/सचिव ग्रामपंचायत कार्यालय रेवसा, ता.जि. अमरावती कडून देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निधीचे नाव वर्ष | अंदाजपत्रकीय किंमत | तरतूद | अनामत रक्कम (१%) | काम करण्याचा कालावधी | निविदा प्रसिद्धीचा वेळ | पंजीबद्ध कंत्राटदाराचे वर्गीकरण | कोऱ्या निविदेची किंमत | कोऱ्या निविदा मिळवण्यासाठी अर्ज करण्याचा दिनांक | भरलेल्या निविदा स्विकृतीचा दिनांक व वेळ | निविदा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सि. कॉ. रस्ता बांधकाम वस्ती क्र.३ | अनु. जाती व नवबौद्ध घटक वस्तीचा विकास | ४०००००/- | ४०००००/- | ४००० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| २ | समाज मंदिर दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग २३-२४ | २५००००/- | २५००००/- | २५०० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| ३ | सार्वजनिक इमारतीवर रेन वॉटर हार्वेस्टिंग बसविणे | १५ वा वित्त आयोग २३-२४ | ४०००००/- | ४०००००/- | ४००० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| ४ | अंगणवाडी मध्ये शौचालय बांधणे केंद्र क्र. 708 | १५ वा वित्त आयोग २३-२४ | ५००००/- | ५००००/- | १५०० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| ५ | सि.कॉ. नाली बांधकाम | १५ वा वित्त आयोग २३-२४ | ३०००००/- | ३०००००/- | ३००० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| ६ | सि.कॉ. नाली बांधकाम | १५ वा वित्त आयोग २३-२४ | २५००००/- | २५००००/- | २५०० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| ७ | रस्ता खडीकरण | १५ वा वित्त आयोग २३-२४ | १५००००/- | १५००००/- | १५०० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| ८ | जि. प. शाळा दुरुस्ती करणे | १५ वा वित्त आयोग २३-२४ | ७००००/- | ७००००/- | ७०० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| ९ | जि. प. शाळा स्वयंपाक कक्ष दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग २४-२५ | ७००००/- | ७००००/- | ७०० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| १० | खडीकरण रस्ता बांधकाम | १५ वा वित्त आयोग २४-२५ | २३००००/- | २३००००/- | २३०० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| ११ | ग्रा. पं. रंगरंगोटी करणे व किरकोळ दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग २४-२५ | १५००००/- | १५००००/- | १५०० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| १२ | रस्ता खडीकर ब्रम्हचारी नगर | १५ वा वित्त आयोग २२-२३ | २०००००/- | २०००००/- | २००० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| १३ | अजा/अज वस्तीमध्ये नाली, रपटे बांधकाम/दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग २१-२२ | २३९६८३/- | २३९६८३/- | २३९७ | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| १४ | अंगणवाडी केंद्र 708,709,710 ची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | १५ वा वित्त आयोग २०-२१ | ५२७८१/- | ५२७८१/- | ५२८ | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| १५ | सी.कॉ. नाली बांधकाम / दुरुस्ती | सामान्य निधी २४-२५ | ४०००००/- | ४०००००/- | ४००० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| १६ | सी.कॉ. रस्ता दुरुस्ती | सामान्य निधी २४-२५ | २०००००/- | २०००००/- | २००० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| १७ | ग्रा.पं. कोंडवाड्या मध्ये कुटार ठेवण्यासाठी सी. ओट्यावर चेनलिंग फेन्सिंग करणे व कोंडवाडा किरकोळ दुरुस्ती करणे | सामान्य निधी २४-२५ | २०००००/- | २०००००/- | २००० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| १८ | टूबलर लोखंडी पोल वर एल. ई. डी. लाईट बसविणे | सामान्य निधी २४-२५ | २०००००/- | २०००००/- | २००० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| १९ | ग्रा.पं.अंतर्गत रेवसा, सुलतानपूर व कॉलनी मध्ये एल. ई. डी. लाईट बसविणे | सामान्य निधी २४-२५ | ३०००००/- | ३०००००/- | ३००० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| २० | नाली बांधकाम करणे (महालक्ष्मी नगर) | सामान्य निधी २४-२५ | ५०००००/- | ५०००००/- | ५००० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |
| २१ | रस्ता खडीकरण करणे (गुलमोहर कॉलनी) | सामान्य निधी २४-२५ | २५००००/- | २५००००/- | २५०० | ३ महीने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० | ०५/१०/२०२४ | १२/१०/२०२४ | ग्रामपंचायत सभेमध्ये |

अटी व शर्ती :- १) निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत रेवसा, ता.जि. अमरावती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) निविदा ह्या दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत.
३) निविदा स्वीकारण्याचे तसेच काही कारणास्तव रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहेत.
४) कामाच्या तरतुदीनुसार काम केले जाईल.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत रेवसा**
**ता.जि. अमरावती**